जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JUN 2022
लोकमत

# विद्यापीठाला सहा वर्षांनी मिळाले पूर्णवेळ अधिष्ठाता

## आर. के. कामत, एस. एस. महाजन यांची निवड : दहाजणांची मुलाखत; दोघेही पुरस्काराने सन्मानित


आर. के. कामत


एस. एस. महाजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. डॉ. आर. के. तथा रजनीश कमलाकर कामत यांची आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. डॉ. एस. एस. तथा श्रीकृष्ण शंकर महाजन यांची निवड झाली. ते प्रभारी अधिष्ठाता होते. या निवडीने सहा वर्षांनी विद्यापीठाला पूर्णवेळ अधिष्ठाता मिळाले आहेत.

प्रशासनाने दोन्ही पदांसाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या मुलाखतींसाठी सहा, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या मुलाखतीस पात्र चार उमेदवार उपस्थित राहिले. डॉ. कामत मूळचे कागलचे आहेत. विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागांचे ते वरिष्ठ प्राध्यापक, अधिविभागप्रमुख आहेत. देश-विदेशांतील जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने गौरविले आहे.

डॉ. महाजन वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्राध्यापक व अधिविभाग प्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक, शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. त्यांचे ४८ शोधनिबंध जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. इंडो-जर्मन एज्युकेशन समीट, ग्लोबल एज्युकेशन समीटसह विद्यापीठाने त्यांना उत्कृष्ट शिक्षक, संशोधक म्हणून पुरस्कारांनी गौरविले आहे.

1 5 JUN 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिष्ठातापदी डॉ. कामत, डॉ. महाजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठातापदी प्रा. रजनीश कमलाकर कामत यांची आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा अधिष्ठातापदी प्रा. श्रीकृष्ण शंकर महाजन यांची निवड करण्यात आली. या पदांसाठी मंगळवारी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या अधिष्ठातापदी निवड झालेले डॉ. आर. के. कामत हे मूळचे कागल येथील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागांचे ते वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख आहेत. देश-विदेशांतील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंत १८ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच.डी.साठी मार्गदर्शन

**शिवाजी विद्यापीठ**



डॉ. कामत



डॉ. महाजन

केले आहे. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसह विद्या परिषद, अधिसभा सदस्य आहेत.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे नूतन अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्राध्यापक व अधिविभागप्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. डॉ. महाजन यांचे ४८ शोधनिबंध दर्जेदार जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांतून त्यांनी ६८ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या तीन लघू आणि यूजीसी, आयसीएसएसआर आणि इम्प्रेस यांच्या तीन संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठाता पदासह त्यांनी विद्या परिषद सदस्य, अधिसभा सदस्य आणि अभ्यास मंडळ अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे.

## दिवसभर मुलाखती

दिवसभरात विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखांसाठी पूर्णवेळ अधिष्ठाता पदांसाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या मुलाखतींसाठी पात्र आठपैकी सहा उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेच्या मुलाखतीस पात्र चारही उमेदवार उपस्थित राहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JUN 2022
सकाळ

# अधिष्ठातापदी कामत, महाजन

## मुलाखतीद्वारे निवड; संशोधन कार्यात दोघांचेही मोलाचे योगदान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिष्ठाता पदासाठी आज मुलाखती झाल्या. पात्र आठपैकी सहा उमेदवार उपस्थित होते. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. रजनीश कमलाकर कामत यांची विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठातापदी; तर वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता म्हणून डॉ. श्रीकृष्ण शंकर महाजन यांची निवड झाली.



डॉ. कामत



डॉ. महाजन

डॉ. आर. के. कामत मूळचे कागल येथील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र अधिविभागांचे ते वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख आहेत. देशविदेशांतील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंत १८ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच.डी.साठी मार्गदर्शन केले आहे. शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन करण्यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक म्हणून काम करताना नॅक (बंगळूर) यांच्याकडून विद्यापीठास A++ मानांकन मिळवण्यातही त्यांचा मोलाचा वाटा राहिला. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांनी परीक्षा सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राजेश अग्रवाल समितीवर तसेच सरकारच्या राज्य गुणवत्ता परिषदेवरही काम केले आहे.



वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे नूतन अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्राध्यापक व अधिविभाग प्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संशोधन परीक्षण समित्यांसह पुणे विद्यापीठ व मुंबईच्या होमी भाभा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे. डॉ. महाजन यांचे ४८ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी ६८ शोधनिबंध सादर केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
15 JUN 2022
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. चंद्रकांत लंगरे यांची पोलंड चर्चासत्रासाठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील डॉ. चंद्रकांत लंगरे यांची लुब्लीन (पोलंड) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. ते 'बीयॉंड द वर्ल्ड ऑफ केआस रिथिंकींग जोसेफ कॉनरॅडस् ह्युमॅनिझम इझ हीज लाईफ नरेटिव्हज्" हा शोधनिबंध सादर करणार आहेत.

जोसेफ कॉनरॅड सोसायटी, पोलंड, मारीया क्युरी स्क्लोडोव्हस्का युनिव्हर्सिटीमध्ये २० ते २३ जून दरम्यान होणार आहे. कोलंबीया युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क, युरोपियन पार्लमेंट आणि इंग्रजी भाषा व साहित्य अधिविभाग मारीया क्युरी सुनिव्हर्सिटी सुब्लीन यांचा हा संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. डॉ. लंगरे यांनी जगप्रसिद्ध आंग्ल कादंबरीकार जोसेफ कॉनरेंड यांच्या कादंबरीवर पीएच. डी. संशोधन केले आहे. या विषयावर त्यांनी यापूर्वी इंग्लंड आणि इटली या देशात, जोसेफ कॉनरॅड सोसायटी (इंग्लंड) येथील नामवंत विद्यापीठातील चर्चासत्रात संशोधन सादर केले आहेत.

या चर्चासत्रानंतर ते पोलंड येथील वॉरझॉ, क्रॅकॉ आणि झेकीपेन येथील जोसेफ कॉनरॅड यांच्या साहित्य आणि सांस्कृतिक योगदानावर निर्माण झालेल्या संग्रहालय व स्मृतीस्थळांना भेट देणार आहेत. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृसी करेकट्टी यांचे मार्गदर्शन मिळाले. या चर्चासत्रासाठी ते लवकरच पोलंडला रवाना होत आहेत.

15 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिष्ठातापदी कामत, महाजन यांची निवड

## शिवाजी विद्यापीठातील अधिष्ठातापदांसाठी मुलाखतीनंतर निवड समितीकडून निवडी जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. आर. के. कामत आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. एस. एस. महाजन यांची निवड करण्यात आली. मंगळवारी या पदासाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या मुलाखतींसाठी पात्र आठ उमेदवारांपैकी सहा उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या मुलाखतीसाठी पात्र चारही उमेदवार उपस्थित होते. या मुलाखती झाल्यानंतर निवड समितीने दोन्ही अधिशाखांच्या उमेदवारांची निवड जाहीर केली.

**डॉ. आर. के. कामत यांचा परिचय**

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झालेले डॉ. आर. के. कामत मूळचे कागल येथील आहेत. ते शिवाजी




**डॉ. आर. के. कामत डॉ. एस. एस. महाजन**

विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र अधिविभागाचे अधिविभागप्रमुख आहेत. देशविदेशातील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंत १८ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच. डी.साठी मार्गदर्शन केले आहे. विद्यापीठात भारत सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन करण्यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक म्हणून काम करताना नॅक (बंगळूर) यांच्याकडून विद्यापीठाला 'एप्लसप्लस' मानांकन मिळवण्यातही त्यांचे योगदान आहे. गेल्या पाच वर्षांत त्यांना १० कोटी रुपयांचे संशोधन प्रकल्प मंजूर झाले आहे. त्यांनी युरोप आणि दक्षिण पूर्व आशियातील अनेक देशांना संशोधनाच्या निमित्ताने भेटी दिल्या आहेत. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, अधिसभेचे ते सदस्य आहेत. इतर अनेक संस्थांचे विद्यापीठ अनुदान आयोग नामांकित सदस्य आहेत. त्यांनी महाराष्ट्रात परीक्षा सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राजेश अग्रवाल समितीवर तसेच महाराष्ट्र सरकारच्या राज्य गुणवत्ता परिषदेवरही काम केले आहे.

**डॉ. एस. एस. महाजन यांचा परिचय**

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे नूतन अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे अधिविभागप्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संशोधन परीक्षण समित्यांसह पुणे विद्यापीठ व मुंबईच्या होमी भाभा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे. डॉ. महाजन यांचे ४८ शोधनिबंध जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांमधून त्यांनी ६८ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. तर १३ जणांनी एम. फील. पूर्ण केले. त्यांनी विद्यापीठाच्या तीन लघु आणि युजीसी, आयसीएसएसआर आणि इम्प्रेस यांच्या तीन मोठ्या संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. प्रभारी अधिष्ठातापदासह त्यांनी विद्यापरिषद, अधिसभा सदस्य आणि अभ्यास मंडळ अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. इंडो-जर्मन एज्युकेशन समीट मुंबई २०१६, ग्लोबल एज्युकेशन समीट, बंगलोर २०१७ या परिषदांसह शिवाजी विद्यापीठातर्फेही त्यांना उत्कृष्ट शिक्षक व संशोधक पुरस्कारांनी गौरविले आहे.